
ISBN No. 978-93-83813-33-9

# मराठी साहित्याचा आंतरराष्ट्रीय परिप्रेक्ष



प्रधान संपादक

डॉ. एस. जे. पवार | प्रा. धन्यकुमार बिराजदार

सहायक संपादक

प्रा. गंगाधर गेंड | डॉ. परमेश्वर पाटील

Scanned with CamScanner

## अनुक्रमणिका

लेखाचे नाव


| | | |
|---|---|---|
| | | पान नं. |
| १. | बसवेश्वरः स्त्री मुक्ति चळवळ – डॉ. एस.जे. पवार | १ |
| २. | महात्मा बसवेश्वर : सामाजिक समतेचे प्रणेते – प्रा.धन्यकुमार जिनपाल बिराजदार | ९ |
| २. | सामाजिक क्रांतीचे प्रेरणास्त्रोत : संत तुकाराम – डॉ. एस. जे. जहागिरदार | १४ |
| ३. | नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कथासाहित्यातील स्त्री जीवन – प्रा. गंगाधर म. गेंड | २० |
| ४. | मराठीला जागतिक स्थान देणारे : राजर्षी शाहू महाराज – डॉ. श्रीपती म.रायमाने | २९ |
| ५. | बहिणाबाईचे मराठी साहित्याला योगदान – प्रो : नर्मदा र कुराडे. | ३४ |
| ६. | कुसुमाग्रजांचे वैश्विक साहित्याला योगदान – प्रा. चारूदत्त भा. कासार | ४० |
| ७. | भारतीय साहित्यातील संक्षिप्त शेतकरी जीवन – डॉ.बापुराव व्ही. पाटील | ४७ |
| ८. | समाजजीवन–लोकजीवनाचे प्रतिबिंब : लोकसाहित्य – परमेश्वर म. पाटील | ५५ |
| | | ६३ |
| ९. | मराठी भाषा– बाल साहित्य – प्रा. विदया एस. हिरेमठ | ६९ |
| १०. | मराठी दलित कविता : आंबेडकरी विचारधारा – डॉ.पी.एम. पाटील | ७८ |
| ११. | जागतिकीकरण आणि मराठी – प्रा.डॉ. अमित शिवाजीराव | ८१ |
| १२. | मराठी भाषेची स्थिती गती – प्रा. अलका आ. मुतगेकर | ९२ |
| १३. | बहिणाबाई मराठी साहित्याची आई – नताशा अनिल गायकवाड | ९५ |
| १४. | “दलित साहित्य व अण्णाभाऊ साठे” – आरती रा. चव्हाण | ९८ |
| १५. | “लोकसंपर्क माध्यम आणि हिंदी” – प्रा. नीता पाटील | |


Scanned with CamScanner

# भारतीय साहित्यातील संक्षिप्त शेतकरी जीवन

डॉ.बापुराव व्ही. पाटील

शेतकऱ्यांची व्याख्या करणे तेवढे सोपे नसून ते अवघड सुध्दा आहे. कारण त्यांची व्याख्या त्यांच्या कार्यावरती करावी का त्यांच्या पेशेवरती? ही एक मोठी समस्या आहे. तरी आम्ही असे सांगू शकतो की, शेती करणारा तो शेतकरी, काबाडकष्ट करून जीवजंतु किटक-प्राणी यांच्या तोंडातून अन्नधान्य वाचवून ते माणसांसाठी आरक्षित ठेवणारा तो शेतकरी. अनादी काळापासून म्हणजे जेव्हा माणूस जन्माला आला तेव्हा शेतीची कल्पना सुचली नव्हती. जेव्हा त्याला ही कल्पना सुचली तेव्हाच तो एक शाकाहारी माणूस म्हणून एक स्थिर जीवन जगू लागला. अगदी प्राचीन काळात माणूस हा एका ठिकाणी स्थिर राहून जगत नव्हता. त्याच्याकडे भविष्याची चिंता नव्हती. तो अन्न व पाणीच्या शोधात भटकंत होता. जसे-जसे समस्या अवघड होत गेली तस-तसे त्याची बुध्दी त्याला समस्यांतून मार्ग काढण्याचे शिकवत गेली. आणि त्यातूनच व्यवसाय जन्माला आले. त्यातिलच एक व्यवसाय म्हणजे तो शेती हा व्यवसाय करणारा तो शेतकरी. जगात सर्वप्रथम कुठला व्यवसाय जन्माला आला असा कोणी प्रश्न केला तर त्याला उत्तर फक्त एकच येईल ते म्हणजे शेती व्यवसाय. माणूस म्हणून जगणार असेल तर त्याला शेती व्यवसाय हे फार आवश्यक आहे कारण सर्व व्यवसाय हे आम्हाला सुख-सुविधा पुरविणारे आहेत. मात्र शेती व्यवसाय



Scanned with CamScanner

आम्हाला जगवणारा आहे. शेती व्यतिरिक्त सर्व बंद पडले तरी माणूस जगू शकतो परंतु चुकून शेती व्यवसाय बंद पडला तर आम्ही रानटी प्राणी होऊनच जगू शकू.

भारतीय ग्रामीण व्यवस्थेचा प्रमुख आधार म्हणजे शेती आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे. कृषिच्या चोहोंबाजूंनी ग्रामीण आणि आर्थिक, सामाजिक संरचना केंद्रित आहे. भारतीय जीवनाचे वास्तविकता खेड्यात दिसते. खेड्यात राहणारे जास्तीत जास्त लोक शेती करणारे आहेत. त्यासाठी गावाचा विकास हाच खरा देशाचा विकास आहे. आज शेतकऱ्यांना उत्तम खत, बीज, विद्युत आणि पाण्याची टंचाई आहे. या सर्व सुविधा त्यांना मिळत नाहीत. त्यातच बेकारी, निर्धनता, कर्ज आणि अनारोग्य अशा अडचणी त्यांना सतावत असतात.

इतिहासातील साहित्य जेव्हा वाचतो तेव्हा त्यात सर्व भाषांच्या साहित्यामध्ये आम्हांला शेतकरी जीवनावरती रचना केलेली ग्रंथ मिळतात. सर्व भारतीय भाषांचे जननी मानले गेलेले भाषा संस्कृतमध्ये सुध्दा शेतकऱ्यांविषयी साहित्य उपलब्ध आहे.

*** संस्कृत साहित्यात कृषक जीवन**

आज विज्ञान आणि तंत्रज्ञान कितीही विकसित झाले असले तरी आपले जीवन निर्वाहासाठी लगणाऱ्या आहारात मात्र बदल झालेला नाही म्हणून प्राचीन काळापासून ते आजपर्यंत आणि पुढेसुध्दा शेती हे माणसांसाठी फार मोठी भूमिका बजापणार आहे.



Scanned with CamScanner

संस्कृत साहित्यात अन्नाचे महत्व सांगताना असे लिहितात 'अन्नतो प्राणः प्राणतो पराक्रमः' म्हणजे अन्नामुळेच प्राणाचे अस्तित्व टिकून राहते आणि प्राणावरतीच देहाची शक्ति अवलंबून असते. याचा अर्थ असा होतो की शक्ति हे शेतकऱ्यावरतीच अवलंबून आहे. प्राचीन काळामध्ये पण विविध अन्नधान्याची माहिती आणि महत्त्व लोकांना माहित होते. त्याकाळी पण शेतकरी विविध अन्नधान्याची निर्मिती करीत होता. यजुर्वेदामध्ये एक श्लोकाद्वारे विविध अन्नधान्याची गणना केली आहे. 'व्रीहयश्चमे, यवाश्चमे, माषाश्चमे, तिलाश्चमे, मुद्राश्चे, खल्वाश्चमे, मसुराश्चमे, नीवाराश्चमे' याप्रकारे सर्व अन्नधान्य सरळ रूपात उपलब्ध होऊ दे म्हणून प्रार्थना केली जात होती म्हणजे त्यावेळी सुध्दा लोकांना विविध प्रकारचे अन्नधान्य पुरवणारे शेतकरी किती कष्ट करून याप्रकारे धान्य पिकवत होता याची माहिती होते.

'परावर्ष महर्षी' यांनी कृषि विज्ञानावरती संशोधन करून 'कृषिपराशर' नावाचे ग्रंथ लिहिले ते आपल्या पुस्तकामध्ये असे लिहितात–

**''प्रजापति नमस्कृते कृषिकर्म विवेचनम्।**

**कृषकाणः हितार्थाय श्रृते कृषि पराशर।।''**

याचा अर्थ असा होतो की सर्वांना उपयोगी अशा कृषी भूमिका निर्माण करणाऱ्या ब्रह्माला नमस्कार करून शेती द्वारा सर्व जणांना अन्न पुरविणाऱ्या शेतकऱ्यांसाठी मी या कृतिचा निर्माण



Scanned with CamScanner

करीत आहे. म्हणजेच ब्रह्मानेच हे काम शेतकऱ्याला लावले आहे असा अर्थ होतं . याद्वारे आम्हांना प्राचीन काळात शेतकऱ्यांचे महत्त्व काय होते हे समजते.

*** हिंदी साहित्यात कृषक जीवन**

हिंदी साहित्याच्या उद्‌भव पासून ते आजपर्यंतच्या सर्व लेखकांनी शेतकऱ्यांवरती कुठे ना कुठे आपली लेखणी चालवलेली दिसते. मात्र प्रेमचंदाच्या कादंबरीमध्ये जे शेतकरी वर्णन आहे ते अजोड आणि प्रशंसनीय आहे. साहित्य उद्‌भवते वेळी जे शेतकऱ्यांवरती लेखन झाले ते पारतंत्र्यांमधील साहित्यात दिसून येत नाही. इंग्रजी राजवटीत शेतकरी जीवनावर फार कमी प्रमाणात लेखन केले गेले. भारतीय शेतकरी शोषण आणि गरिबी या विषयांवरती भारतेंदु हरिश्चंद्र यांनी काही प्रमाणात लेखन केले. त्यानंतर प्रेमचंद यांच्या साहित्यात शेतकरी वर्ग दिसून आला. त्यांची कादंबरी 'कर्मभूमि' मध्ये जमिनीची समस्या, शेती मजूर समस्या आणि शेती कराविषयी चर्चा दिसून येते. यानंतर त्यांचे दूसरे महत्त्वपूर्ण कादंबरी 'गोदान' मध्ये शेतकरी आणि शेत मजूरांची शोषण याविषयी लेखन केलेले दिसून येते. या कादंबरीत 'होरी' एक शेतकरी असून तो असा उद्‌गार काढतो की "कर्ज हे एक पाहुण्यासारखे असते. एकदा आले म्हणजे जाण्याचा नाव सुध्दा घेत नाही." या उद्‌गाराद्वारे शेतकऱ्यांच्या कर्जाविषयी चित्रिण करताना दिसून येतात. रामदरश मिश्र यांच्या 'सूखता हुआ तालाब' या कादंबरीत महाजन शामदेव



Scanned with CamScanner

गावच्या शेतकऱ्यांना आणि शेतमजुरांना कर्ज देऊन त्यांचा आर्थिक शोषण करतो. सावकार, महाजन आणि जमिनदार यांच्या सोबतच सरकारी कर्मचारी सुध्दा शेतकऱ्यांचे शोषण करतात. याची माहिती 'सूखता हुआ तालाब' मध्ये वाचायला मिळते. याच्या व्यतिरिक्त हिंदी नाटकांमध्ये, रेखचित्रामध्ये तसेच कवितांमध्ये सुध्दा शेतकऱ्यांच्या शोषणावरती लेखन केलेले पाहायला मिळते.

*** मराठी साहित्यात कृषक जीवन**

भारतीय समाजात सर्वात शोषित आणि शापित तीन घटक दिसून येतात.–स्त्री, दलित आणि शेतकरी. पहिला घटक स्त्री आज आपल्या हक्कासाठी लढत आहे. तर दलितांना आंबेडकरांच्या चळवळीने दिशा मिळाली. मात्र भारतीय समाजातील शेतकरी सातत्याने वंचित, उपेक्षित आणि शोषित राहिलेला आहे. आजसुध्दा त्याला कोणी वळण देणारा अथवा परिवर्तनाच्या दिशेने नेणारा नेता मिळालेला नाही म्हणून त्याचे आत्महत्येचे प्रमाण आजही दिसत आहेत. त्याला कारण अनेक असतील संकट मात्र एक आहे. जगात अन्नधान्य उत्पन्न करणारे जेवढे देश आहेत ते दरिद्री आहेत असा अहवाल आहे. शेतकऱ्यांना पूरक व्यवसाय नसल्यामुळे ते संकटात पडतात आणि आत्महत्या करतात असे सांगितले जाते. प्रत्यक्ष कारण मात्र वेगळे आहे ते म्हणजे कृषि मालाला आधारभूत किम्मत मिळत नाही. ही जबाबदारी सरकारची आहे. मग आत्महत्येचा वाली कोण? असा प्रश्न सामोरे येऊन जातो. मराठी साहित्यात



Scanned with CamScanner

शेतकऱ्यांविषयी साहित्य लिहिले गेले, वाचले गेले आणि प्रशंसाही केली गेली. परिणाम मात्र काहीच झाले नाही.

मराठी साहित्यात पूर्वी काळापासून म्हणजेच संत साहित्यामध्ये सुध्दा आम्हाला शेतकरी जीवन वर्णन त्यांच्या समस्यांवरती चर्चा केलेली वाचायला मिळते. विशेष रूपामध्ये संत तुकाराम महाराजांच्या साहित्यात जे शेतकरी वर्णन आहे ते फार सत्याच्या जवळचा लिखाण आहे. श्रेष्ठ संत तुकाराम महाराज हे बहुजनांचे शेतकऱ्यांचे पहिले नायक आहेत. शेतकरी कष्टकरी आणि श्रमकरी समाजाचे ते वारस होते. खरे तर तुकाराम हे जन्म जीवनाने आणि वृत्तिप्रवृत्तीने शेतकरी होते त्यामुळे प्रतिनिधिक ग्रामीण माणसांचे कष्टकऱ्यांचे जगणे त्यांच्या वाट्याला आले. संत तुकारामांना त्यांच्या प्रदेशाविषयी, भूमिविषयी, शेती आणि शेतकऱ्यांविषयी प्रचंड प्रेम होते. शेतकरी जीवनावरती व कृषि जीवन जाणिवासंबंधी तुकारामांनी दिडशेच्या जवळपास अभंग रचलेले आहेत.

**"खोल ओली पडे ते पीक उत्तम"**

**"मडे झाकुनिया करिती पेरणी"**

**"शेत आले सुगी सांभाळावे कोण ?"**

**"उस डोंगापरि रस नोहे डोंगा"**

अशा अनेक अभंगातून शेतकरी साक्षात झालेला आहे. या अभंगा व्यतिरिक्त महात्मा फुलेंचा 'शेतकऱ्याचा असूड', ना. धो.



Scanned with CamScanner

महानोर यांच्या ‘पळसखेडची गाणी’ आनंद यादव यांचा ‘गोतावळा’ अशा अनेक मराठी लेखकांच्या साहित्यामध्ये शेतकरी जीवन चित्रित केलेले दिसून येते.

## * कन्नड साहित्यात कृषक जीवन

सर्व साहित्याप्रमाणे कन्नड साहित्यामध्ये ही प्राचीन काळापासून शेतकऱ्यांचा जीवन वर्णन करण्यात आलेला आहे. त्यामध्ये कुवेंपु यांच्या कवितांमध्ये शेतकऱ्यांचा चित्रण ते करीत म्हणतात की शेतकऱ्यांना कुठल्याही सरकारशी काहीही देणे घेणे नसते. सरकार कुठलाही असला तरी त्यांना आपले जीवन मात्र शेतीवरतीच जगावे लागते. त्यांना कष्टाविना फळ मिळत नाही. त्याचा शेतकरी असे म्हणतो की आम्हांना कुठले ही साम्राज्य नको आहे आणि कुठलेही चळवळ सुध्दा नको आहे. कुवेंपु आपल्या ‘रैतन दृष्टि’ नावाच्या काव्य संग्रहामध्ये लिहितात की शेतकरी हा कितीही गरीब असला तरी तो आपले जीवन शेतातल्या कामासोबत काढत असतो आणि आपले दुःख विसरुन जीवन जगत असतो.

देशातील कानाकोपऱ्यात विभाजित शेतकरी वर्ग हा त्या त्या क्षेत्रिय भाषेच्या साहित्यात विविध रुपात विखुरलेला दिसतो. एकाच भाषेच्या साहित्यात संपूर्ण शेतकऱ्याला पाहणे शक्य नसून ते अवघड पण आहे. त्यासाठी सर्व भाषेतील साहित्यात असणारा शेतकरी जीवन एकत्रित करुन ते एकाच ठिकाणी संग्रहित केल्यावर शेतकऱ्याचे संपूर्ण चित्र साकारता येईल. एवढे करुन देखील



Scanned with CamScanner

शेतकऱ्यांच्या काही समस्या ह्या साहित्यामध्ये अजून देखील रेखाटलेले दिसून येत नाही कारण लिहिणारा हा शेतकरी नाही आणि समस्या ह्या लिहिणाऱ्यांचे नाहीत.

**डॉ. बापुराव व्ही. पाटील**
एस.बी. कला आणि के.सी.पी. विज्ञान
महाविद्यालय विजयपुर, मो. ९०३५८६४२३९



Scanned with CamScanner